(नगर विकास विभाग-२)

१०० दिवस कार्यक्रमाची सद्यस्थिती - ३०-४-२०२५

| अ.क्र. | मुद्दा | कार्यवाही पूर्ण / अपूर्ण | पूर्ण असल्यास त्याबाबतची माहिती व शासन निर्णय / फोटो / इ. अभिलेख किंवा त्याची लिंक | अपूर्ण असल्यास सद्यस्थिती व कार्यवाही पूर्ण करण्याची कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | शहरांतील विकास कामावरील गुंतवणुकीचा प्राधान्यक्रम ठरवून -शहर पायाभूत सुविधा गुंतवणूक प्राथमिकता आराखडा तयार करणे.<br>सदर आराखड्यातील प्राधान्यक्रमानुसार शहरांना विविध योजनातून अर्थसहाय्य करणे तसेच आराखड्यास अनुसरून सध्याच्या योजनांमध्ये अनुरूप बदल करण्यात येतील. | पूर्ण | राज्यातील शहरांमध्ये आजपर्यंत हाती घेतलेल्या विविध विकास कामांमुळे प्रत्येक शहर पायाभूत सुविधांच्या बाबतीत विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर आहे.<br>शहरातील सध्या विकसित झालेल्या पायाभूत सुविधा व भविष्यात निर्माण करावयाच्या सुविधा यांची गरज वेगवेगळी आहे. यास्तव हाती घेण्यात येणाऱ्या विविध पायाभूत सुविधांचा प्राधान्यक्रम निश्चित करून शहरांमध्ये नियोजनबद्ध पद्धतीने पायातभूत सुविधा विकसित करणे व त्यात सुसुत्रता आणण्याकरिता मा. मुख्यमंत्री महोदयांच्या शंभर दिवस नियोजन आराखड्यात शहरातील विकास विकास कामांवरील गुंतवणुकीचा प्राधान्यक्रम ठरवून शहर पायाभूत सुविधा गुंतवणूक प्राथमिकता आराखडा तयार करण्याचे सुनिश्चित करण्यात आले आहे.<br>या अनुषंगाने शहर पायाभूत सुविधा गुंतवणूक प्राथमिक आराखडा व शहरातील विकास कामांवरील गुंतवणूकीचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आलेला असून त्याचे मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली आहेत.<br>यामुळे नागरिकांना पाणीपुरवठा, मलनिस्सारण, रस्ते, बगीचा इत्यादी नागरी सुविधा प्राधान्याने व अधिक नियोजनबद्ध पद्धतीने देता येतील.<br>शासन निर्णय क्रमांक:-संकिर्ण-२०२५/प्र.क्र.१५/नवि-१६(ई-९३१९२७) दि.२३.०४.२०२५<br>https://gr.maharashtra.gov.in/Site/Upload/Government%२०Resolutions/Marathi/२०२५०४२३१८३२२५१०२५.pdf | ------ |
| २ | अमृत २.० अभियानांतर्गत उर्वरित रु.५,८०९ कोटी किंमतीच्या ६० प्रकल्पांना प्रशासकीय मंजुरी देऊन यंत्रणा निश्चित करणे. | कार्यवाही सुरु | ------ | अमृत २.० अभियानांतर्गत उर्वरित ६० प्रकल्पांपैकी १६ प्रकल्पांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली आहे व उर्वरित प्रकल्पांना मंजूरी देण्यासाठीची कार्यवाही प्राथम्याने करण्यात येत आहे. |
| ३ | अमृत २.०, SBM २.०, नगरोत्थान महाभियान इ. शासकीय योजनातून हाती घेतलेल्या प्रकल्पांतील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्व-हिस्स्यासाठी कर्ज पुरवठा करण्याकरिता (सुमारे रु. ७,००० कोटी) वित्तीय संस्थांची निवड करणे. | पूर्ण | हुडको या वित्तीय संस्थेची निवड करण्यात आली आहे (प्रत संलग्न). | ------ |
| ४ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील बांधकामासाठी आदर्श निविदा पुस्तिका (Model Tender Documents) तयार करणे. | पूर्ण | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था विविध विकास कामांच्या अनुषंगाने निवदा प्रसिद्ध करीत असतात. सदर निविदा प्रक्रियेमध्ये सुसुत्रता आणण्याकरीता आदर्श निविदा पुस्तिका तयार करण्याची बाब मा.मुख्यमंत्री महोदयांच्या १०० दिवस कार्यक्रम आराखड्यात सुनिश्चित करण्यात आली आहे.<br>सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बी-१ व बी-२ निविदा पुस्तिका या स्थायी स्वरुपाच्या असल्यामुळे सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निविदा पुस्तिकांचा वापर करण्याचे सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सूचना देण्यात आल्या आहेत.<br>यामुळे सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निविदा प्रक्रियेमध्ये एकवाक्यता, सुसुत्रता व पारदर्शकता येणार असून यामुळे नागरिकांन करिता दर्जेदार सुविधा निर्माण करता येणार आहेत.<br>शासन निर्णय क्रमांक :-संकिर्ण-२०२५/प्र.क्र.१६/नवि-१६(ई-९३१९४७) दि.२९.०४.२०२५<br>https://gr.maharashtra.gov.in/Site/Upload/Government%२०Resolutions/Marathi/२०२५०४२९१६२८२६७५२५.pdf | ------ |
| ५ | नगरपरिषद व नगरपंचायत यांच्या प्रशासकीय इमारतीचे "Type Plan" तयार करणे. | कार्यवाही सुरु | ------ | मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांच्या स्तरावर कार्यवाही सुरू आहे, तदनंतर सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय यांची मान्यता घेऊन शासन मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात येईल कालमर्यादा-१० दिवस |

(नगर विकास विभाग-२)
१०० दिवस कार्यक्रमाची सद्यस्थिती - ३०-४-२०२५

| अ.क्र. | मुद्दा | कार्यवाही पूर्ण / अपूर्ण | पूर्ण असल्यास त्याबाबतची माहिती व शासन निर्णय / फोटो / इ. अभिलेख किंवा त्याची लिंक | अपूर्ण असल्यास सद्यस्थिती व कार्यवाही पूर्ण करण्याची कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| ६ | मनपा / नपा क्षेत्रात सद्या प्रगतीपथावर असलेल्या मुलभूत सोई सुविधांच्या विकास कामांना पर्याप्त तरतूद उपलब्ध करून देऊन त्यांचे सनियंत्रण करणे. | पूर्ण | सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीय तरतूद तसेच आवश्यकतेनुसार पुरवणी मागणी याद्वारे निधी उपलब्धता करण्यात येणार आहे यामुळे मुलभूत सोयी सुविधांची कामे लवकर पूर्ण होऊन नागरिकांना सदर सुविधा उपलब्ध होतील. | ------ |
| ७ | शहरातील पाणीपुरवठा व मलनिस्सारण सुविधेतील तफावत दूर करण्याचा कृति आराखडा तयार करणे. | पूर्ण | राज्यातील शहरांमध्ये आजपर्यंत हाती घेतलेल्या विविध विकास कामांमुळे प्रत्येक शहर पायाभूत सुविधांच्या बाबतीत विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर आहे.<br>शहरातील सध्या विकसित झालेल्या पायाभूत सुविधा व भविष्यात निर्माण करावयाच्या सुविधांची गरज वेगवेगळी आहे. यास्तव हाती घेण्यात येणाऱ्या विविध पायाभूत सुविधांचा प्राधान्यक्रम निश्चित करून शहरांमध्ये नियोजनबद्ध पद्धतीने पायात सुविधा विकसित करणे व त्यात सुसुत्रता आणण्याकरिता मा. मुख्यमंत्री महोदयांच्या शंभर दिवस नियोजन शहरातील पाणीपुरवठा व मलनिस्सारण सुविधेतील तफावत दूर करण्याचा कृति आराखडा तयार करण्याचे सुनिश्चित करण्यात आले आहे.<br>या अनुषंगाने शहर पायाभूत सुविधा गुंतवणूक प्राथमिक आराखडा व शहरातील विकास कामावरील गुंतवणूकीचा प्राधान्यक्रम व शहरातील पाणीपुरवठा व मलनिस्सारण सुविधेतील तफावत दूर करण्याचा कृति आराखडा व मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली आहेत.<br>यामुळे नागरिकांना पाणीपुरवठा, मलनि:स्सारण या नागरी सुविधा प्राधान्याने व अधिक नियोजनबद्ध पद्धतीने देता येतील.<br>शासन निर्णय क्रमांक:--संकिर्ण-२०२५/प्र.क्र.१५/नवि-१६(ई-९३१९२७) दि.२३.०४.२०२५<br>https://gr.maharashtra.gov.in/Site/Upload/Government%२०Resolutions/Marathi/२०२५०४२३१८३२२५१०२५.pdf | ------ |
| ८ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वीज देयकात बचत करण्यासाठी त्यांना सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी अर्थसहाय्य करण्याबाबत धोरण निश्चिती करणे. | पूर्ण | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचा पाणीपुरवठा योजना, मलजल प्रक्रिया केंद्र, घनकचरा प्रकल्प, पथदिवे, प्रशासकिय इमारती इत्यादी करीता मोठ्या प्रमाणात वीज वापर होत असून सदर प्रकल्पाच्या वीज देयकाचा भार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांवर येतो. हा वीज भार कमी करण्यासाठी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या १०० दिवस नियोजन आराखड्यात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वीज देयकात बचत करण्यासाठी त्यांना सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी अर्थसहाय्य करण्याबाबत धोरण निश्चित करण्याचे ठरले आहे.<br>या अनुषंगाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सौर ऊर्जा प्रकल्प मंजूर करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले असून आता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना नगर विकास विभागाच्या महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास व राज्यातील नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण या योजने अंतर्गत वीजदेयकात बचत करण्यासाठी सौर ऊर्जा प्रकल्प उभारता येणार आहेत.<br>यामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या खर्चात बचत होऊन त्यांना नागरीकांना अधिक सोयी सुविधा देणे शक्य होणार आहे. शासन निर्णय क्रमांक:-संकिर्ण-२०२५/प्र.क्र.१९/नवि-१६(ई-९३१९६४) दि.२९.०४.२०२५<br>https://gr.maharashtra.gov.in/Site/Upload/Government%२०Resolutions/Marathi/२०२५०४२९१६३०३७२४२५.pdf | ------ |
| ९ | मनपा / नपा (अ वर्ग) क्षेत्रातील मालमत्तांचे मुद्रिकरण (Asset Monetisation) करण्याकरिता राज्य स्तरावर सल्लागार संस्थेची नेमणूक करणे व मुद्रीकरणक्षम मालमत्तांची निवड करणे, | कार्यवाही सुरू | ------ | महानगरपालिका/ नगरपालिका (अ वर्ग) क्षेत्रातील मालमत्तांचे मूद्रीकरण करण्याकरिता राज्य स्तरावर सल्लागार संस्थेची नेमणुक करणे करिता RFP upload करण्यात आली आहे.<br>सदर RFP ची दि. २५.०४.२०२५ ही शेवटची तारीख होती. याबाबत दिनांक २८.०४.२०२५ रोजी विविध संस्थांचे सादरीकरण आयोजित करण्यात आलेले आहे. सादरीकरणानंतर यापैकी एका संस्थेची नेमणूक करण्यात येईल.<br>सदर प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी सादरीकरणानंतर किमान सात दिवसांचा कालावधी लागेल.<br>तसेच, या संदर्भात प्राथमिक स्तरावर नाशिक महापालिकेच्या काही मालमत्तांची निवड करण्यात आली आहे. |

(नगर विकास विभाग-२)

१०० दिवस कार्यक्रमाची सद्यस्थिती - ३०-४-२०२५

| अ.क्र. | मुद्दा | कार्यवाही पूर्ण / अपूर्ण | पूर्ण असल्यास त्याबाबतची माहिती व शासन निर्णय / फोटो / इ. अभिलेख किंवा त्याची लिंक | अपूर्ण असल्यास सद्यस्थिती व कार्यवाही पूर्ण करण्याची कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १० | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विविध पायाभूत सुविधा सार्वजनिक खाजगी भागीदारीतून उभारण्याचे धोरण तयार करणे. | कार्यवाही सुरु | ------ | सदर प्रस्ताव मा. मंत्रीमंडळासमोर पुढील ३० दिवसांमध्ये सादर करण्यात येईल. |
| ११ | नगर परिषद व नगर पंचायतींच्या मालकीच्या मालमत्ता आणि व्यावसायिक संकुलांचे / गाळे भाडेपट्ट्याने देण्याचे धोरण सुधारित करणे. | पूर्ण | महानगरपालिका मालमत्ता हस्तांतरण नियमावलीच्या धर्तीवर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी (स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण) (सुधारणा) नियम, २०२५ यास दि.१५ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे ( कार्यवृत्ताची प्रत सोबत जोडली आहे) यामुळे राज्यातील सर्व नागरी स्थानिक संस्थांत मालमत्ता भाडेपट्ट्याने देणे , हस्तांतरण करणे या विषयाबाबत नियमांमध्ये एकवाक्यता येईल. | ------ |
| १२ | शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याच्या पुनर्वापराचे धोरण ठरविणे. | कार्यवाही सुरु | ------ | सदर प्रस्ताव मा. मंत्रीमंडळासमोर पुढील १५ दिवसांमध्ये सादर करण्यात येईल. |
| १३ | प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या पुनर्वापराच्या धोरणाची अंमलबजावणी करणे व सर्व संबंधित विभागांमध्ये समन्वय साधण्यासाठी तसेच पाणीपुरवठा, मलनिःसारण इ. प्रकल्पांसाठी जागा उपलब्ध करून देणे व आवश्यक परवानग्या मिळविणे याकरिता मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्य स्तरीय सुकाणू समिती गठीत करणे (नगर विकास, महसूल, वित्त, नियोजन, सार्वजनिक बांधकाम विभाग, उद्योग, ऊर्जा, जलसंपदा, कृषी, पर्यावरण आणि पाणीपुरवठा व स्वच्छता, संबंधित केंद्रीय संस्था इ.). | कार्यवाही सुरु | ------ | |
| १४ | मध्यम व छोट्या शहरांमध्ये शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमित करणे अथवा सदर जमिनी भाडेपट्ट्याने देऊन नियोजित शहर विकासास चालना देणे व त्यायोगे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्राप्त होणाऱ्या विकास निधीद्वारे व मालमत्ता कराद्वारे त्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या अनुषंगाने धोरण बनविणे. | कार्यवाही सुरु | ------ | सदर विषयाबाबत दि.०२.०४.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रधान सचिव (नवि-२) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने केलेल्या शिफारशीनुसार राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या परिक्षेत्रात असलेल्या त्यांच्या स्वतः च्या जमिनींकरीता महसूल विभाग व नगर विकास विभागाच्या धोरणानुसार, तसेच इतर विभागांच्या जमिनीकरीता त्या-त्या विभागाच्या धोरणानुसार तातडीने कार्यवाही करुन शासकीय जमिन अतिक्रमणमुक्त करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने कार्यवाही करण्याकरीता सर्व संबंधितांना सूचना देण्यासाठी प्रस्ताव मा.उपमुख्यमंत्री यांच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे. ( Electronic No :- १०५३७६१ ) |
| १५ | महानगरपालिकांमधील विविध पदांसाठी सामाईक सेवा प्रवेश नियम करणे. (अग्निशमन सेवा संवर्ग) | कार्यवाही सुरु | ------ | सेवाप्रवेश नियम शासन मान्यतेसाठी सादर. ( Electronic No :- १०६३५७२ ) |
| | महानगरपालिकांमधील विविध पदांसाठी सामाईक सेवा प्रवेश नियम करणे. (महानगरपालिका संवर्ग सेवाप्रवेश नियम) | | | प्रस्ताव शासनास सादर. |
| १६ | महानगरपालिकांमधील अधिकारी / कर्मचाऱ्याच्या बदल्यांचे धोरण ठरविणे. | कार्यवाही सुरु | ------ | प्रस्ताव शासनास सादर. ( Electronic No :- १०९९९८२ ) |
| १७ | "ड" वर्ग दर्जाच्या १४ महानगरपालिकांमधील "आयुक्त" पदावर आणि अ, ब व क वर्ग दर्जाच्या महानगरपालिकेतील "सह आयुक्त" पदावर महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील सह आयुक्त (गट-अ) दर्जाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याची नियुक्ती करणे. | कार्यवाही सुरु | ------ | मा. मुख्यसचिव यांजकडून धारीका अभिप्रायासाठी विभागास प्राप्त झाले आहे. |
| १८ | महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील सह आयुक्त, उप आयुक्त, सहायक आयुक्त गट-अ / गट-ब या पदांतील पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे भरणे. | कार्यवाही सुरु | ------ | सह आयुक्त पदावरील पदोन्नतीचा प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर. ( Electronic No :- १०९३६६१ ) |

| (नगर विकास विभाग-२)<br>१०० दिवस कार्यक्रमाची सद्यस्थिती - ३०-४-२०२५ | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | मुद्दा | कार्यवाही पूर्ण / अपूर्ण | पूर्ण असल्यास त्याबाबतची माहिती व शासन निर्णय / फोटो / इ. अभिलेख किंवा त्याची लिंक | अपूर्ण असल्यास सद्यस्थिती व कार्यवाही पूर्ण करण्याची कालमर्यादा |
| | सहायक आयुक्त , गट-अ पदोन्नती | | एमसीओ-२०२४/प्र.क्र.१२२/नवि-१४ दि २०.०३.२०२५ रोजी आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. (प्रत संलग्न) | ------ |
| १९ | सेवा हक्क अधिनियमांतर्गत सर्व नागरी सेवा १००% ऑनलाईन प्रणालीद्वारे उपलब्ध करून देणे व त्या आपले सरकार पोर्टलशी संलग्न करणे, तसेच ऑनलाईन तक्रारींचे निवारण करण्याकरिता सदर सेवा देणाऱ्या महा-युएलबी प्रणालीचे बळकटीकरण करण्याचा प्रकल्प हाती घेणे. | पूर्ण | सेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित एकूण ७० सेवांपैकी ५६ सेवा ऑनलाईन प्रणालीद्वारे उपलब्ध असून उर्वरित १४ सेवांपैकी २ सेवा नवि-१ कडून ऑनलाईन प्रणालीद्वारे विकसित करण्यात आल्या आहेत. उर्वरित १२ सेवा ऑनलाईन प्रणालीवर उपलब्ध करून देण्यासाठी व त्यांचे आपले सरकार पोर्टलशी इंटिग्रेशन करून देणेबाबत महा-आयटीस दि.२०.०२.२०२५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदर सेवा IWBP प्रकल्पांतर्गत ऑनलाईन विकसित करण्यात येणार आहेत. सदर प्रकल्पाच्या सेवा पुरवठादाराचे प्रकल्पांतर्गतचे जुने देयक रु. ७.६५ कोटी नगर परिषद प्रशासन संचालनालयाकडून महा-आयटीस दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजीच अदा करण्यात आलेले आहे. (नगर परिषद प्रशासन संचालनालयाचे दिनांक २३ डिंबर, २०२४ चे पत्र सोबत जोडले आहे.) तथापि सदर देयक महा-आटीकडून सेवा पुरवठादारास अद्याप अदा करण्यात आलेले नाही. त्यामुळे सेवा ऑनलाईन विकसित करण्याकरिता अडचण निर्माण होत आहे. सदर देयक महा-आयटीकडून अदा करण्यात आल्यानंतरही सदर सेवा ऑनलाईन विकसित करावयास साधारणपणे तीन महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. सबब, उपरोक्त विषयास पूर्णत्वास येण्यास पुढील काही कालावधी लागणार आहे. सदर विषय या विभागाच्या यादीतून वगळण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदय यांना प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.. | ------ |
| २० | सर्व नगरपरिषदांमधील मालमत्तांचे GIS प्रणाली आधारित कर निर्धारण करणे तसेच शहरातील पायाभूत सुविधा विकास कामांचे GIS प्रणाली आधारित Real Time संनियंत्रण करण्याचा प्रकल्प (Maha Urban Project Observatory) हाती घेणे. | पूर्ण | MRSAC या संस्थेने व वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषांगाने स्पष्टीकरणासह Maha Urban Observatory Project दि. २३ एप्रिल, २०२५ रोजी मा. मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समिती (HPC) समोर सादर करण्यात आला. सदर बैठकीचे इतिवृत्त या विभागास प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. | ------ |
| २१ | सर्व महानगरपालिका व अ वर्ग नगरपरिषदांमध्ये ई-ऑफिस प्रणाली लागू करणे. | पूर्ण | सर्व अ वर्ग नगरपरिषदांमध्ये ई-ऑफीस प्रणाली सुरू करण्यात आली आहे. तसेच एकूण १४ महानगर पालिकांमध्ये ई-ऑफीस प्रणाली सुरू करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून उर्वरित महानगरपालिकांमध्ये कार्यवाही प्रगती पथावर आहे. १५ मे, २०२५ पर्यंत उर्वरीत महानगरपालिकांमध्ये ई-ऑफीस प्रणाली सुरू करण्याचे नियोजन आहे. | ------ |
| २२ | नपा/ नपं क्षेत्रातील थकीत मालमत्ता कर व त्यावरील शास्ती अंशतः माफ करून कर वसूल करण्यासाठी अभय योजना लागू करणे व त्याकरिता नगर परिषद कायद्यात बदल करणे. | पूर्ण | कर वसूलीसाठी अभय योजना राबविण्यास मा.मंत्रिमंडळाची दि.१५.०४.२०२५ रोजीच्या बैठकीत मान्यता प्राप्त झाली आहे. कार्यवाही पूर्ण. | ------ |
| २३ | १५ व्या वित्त आयोगाच्या तसेच ५ व्या राज्य वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार व्यवसाय कर राज्य शासनाकडून (राज्य कर विभागाकडून) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे हस्तांतरित करणे व त्यानुरुप कायद्यात आवश्यक सुधारणा करणे. | पूर्ण | सदर विषयाबाबत अभ्यास करण्यासाठी वित्त विभागाकडून अप्पर आयुक्त, जीएसटी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. वित्त विभाग शासन निर्णय क्र. व्यकर-२०२५ / प्र.क्र.११/ कराधान-३ दि. २८ एप्रिल, २०२५ https://gr.maharashtra.gov.in/Site/Upload/Government%२०Resolutions/Marathi/२०२५०४२८१५३९०४७६०५.pdf सदर विषयावर वित्त विभागाकडून कार्यवाही करण्यात येत असल्याने विभागाची कार्यवाही पूर्ण. | ------ |
| २४ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रातून शासनाकडे जमा होणारे विविध कर व त्याचा शासनाच्या एकत्रित निधीतून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना परतावा देण्याएवजी ते कर थेट नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या खाती जमा करणेबाबत विविध विभागाने आवश्यक कायदेशीर बदल करणे (उदा. मुद्रांक शुल्क, NA कर, इ.). | पूर्ण | वित्त विभागांने व्यवसाय कर वगळता इतर करांबाबतचा प्रस्ताव अमान्य केला आहे. | ------ |

(नगर विकास विभाग-२)

१०० दिवस कार्यक्रमाची सद्यस्थिती - ३०-४-२०२५

| अ.क्र. | मुद्दा | कार्यवाही पूर्ण / अपूर्ण | पूर्ण असल्यास त्याबाबतची माहिती व शासन निर्णय / फोटो / इ. अभिलेख किंवा त्याची लिंक | अपूर्ण असल्यास सद्यस्थिती व कार्यवाही पूर्ण करण्याची कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| २५ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची मुद्रांक शुल्क (Stamp Duty) थकबाकी अदा करणे (मनपा- रु.३,३७७ कोटी. व नपा- रु. ६०० कोटी) | पूर्ण | महानगरपालिका मुद्रांक शुल्कासाठी रु. ५०० कोटी व नगरपालिका मुद्रांक शुल्कासाठी रु. १०० कोटी असा एकूण ६०० कोटी अतिरिक्त निधी मार्च २०२५ मध्ये संबंधितांना वितरीत करण्यात आला आहे. उर्वरित निधीची तरतूद सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. | ------ |
| २६ | नव्याने स्थापन होणाऱ्या महानगरपालिकांना वस्तू व सेवा कर (GST) अनुदान अदा करण्यात येत नाही, त्याबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन नवीन महानगरपालिकांना वस्तू व सेवा कर (GST) अनुदान देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे. | पूर्ण | नव्याने निर्मित महानगरपालिकांना वस्तू व सेवा कर अनुदान सुरु करण्याबाबतचा मंत्रिमंडळ प्रस्ताव अभिप्रायार्थ वित्त विभागास सादर करण्यात आला होता. त्यावर **"नगर विकास विभागाने उपस्थित केलेल्या मुदयांची वित्त विभागाने नोंद घेतलेली असून, त्या संदर्भात वित्त विभागाकडून उचित कार्यवाही करण्यात येईल"** असे वित्त विभागाने अभिप्राय दिले. त्या अनुषंगाने सदर विषयावर वित्त विभागाकडून कार्यवाही करण्यात येत असल्याने **सदर विषय या विभागाच्या यादीतून वगळून वित्त विभागाच्या नावे दर्शविण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदय यांना प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.** | ------ |
| २७ | लातूर व परभणी यांना अत्यल्प वस्तू व सेवा कर (GST) अनुदान असल्यामुळे त्यांचा आस्थापना खर्च व विकास कामांवरील खर्च विचारात घेऊन त्यात उचित सुधारणा करण्याचा धोरणात्मक निर्णय घेणे. | कार्यवाही सुरू | ------ | वस्तू व सेवा कर अनुदान अत्यल्प असलेल्या लातूर व परभणी महानगरपालिकांना यापूर्वी दिले गेलेले सहाय्यक अनुदान नैसर्गिक वाढीसह अव्यहातपणे पुढे चालू ठेवण्याचा पर्याय उपलब्ध करुन देण्याचा मंत्रिमंडळ प्रस्ताव वित्त विभागास अभिप्रायार्थ सादर करण्यात आला होता. त्यावर **" भविष्यात इतर महानगरपालिकांकडूनही अशी मागणी येण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, नगर विकास विभागाने फेर प्रस्ताव सादर करावा "** असे वित्त विभागाने निर्देश दिले आहेत. त्यानुसार वित्त विभागास प्रस्ताव फेर सादर करण्यात आला आहे. |
| २८ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रातील मालमत्तांचे फेर सर्वेक्षण व पुनर्मुल्यांकन करण्याची मोहीम हाती घेणे. | पूर्ण | आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई यांचे दि.११ फेब्रुवारी, २०२५ रोजीचे पत्रान्वये राज्यातील सर्व महानगरपालिका / नगरपरिषदा/ नगरपंचायती यांना नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांतील मालमत्तांचे फेर सर्वेक्षण व पुनर्मुल्यांकन करण्याची मोहीम हाती घेण्याबाबत कळविण्यात आले आहे. या पत्रानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांतील मालमत्तांचे फेर सर्वेक्षण व पुनर्मुल्यांकन करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे.<br>या मोहीमेच्या अनुषंगाने खालील माहिती देण्यात येत आहे: -<br>अ) सन २०२४-२५ मध्ये एकूण ८० नगरपालिका व नगरपंचायतींची आणि ७ महानगरपालिकांची पुनर्मूल्यांकनाची बाब due नाही.<br>ब) २८९ नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये २०२४-२०२५ या आर्थिक वर्षानतंर मालमत्ता कर फेर आकारणीच्या कामास सुरुवात होणार आहे.<br>क) २८ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राज्य शासनाने पुनर्मूल्यांकन प्रक्रियेस स्थगिती दिली आहे. त्यापैकी १३ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्थगिती उठविणेसाठी शासनास प्रस्ताव सादर केले आहेत. | ------ |
| २९ | मालमत्ता कर भांडवली मूल्याधारित लागू करणे. | पूर्ण | कायाद्यातील मूळ तरतूदीप्रमाणे कार्यवाही करावी | ------ |
| **एकूण** | | **एकूण संख्या-२९** | **एकूण पूर्ण कामांची संख्या - १७** | **एकूण अपूर्ण कामांची संख्या - १२** |

शहरातील विकास कामावरील गुंतवणुकीचा प्राधान्यक्रम ठरवून शहर पायाभूत सुविधा गुंतवणूक प्राथमिकता आराखडा तसेच पाणीपुरवठा व मलनि:स्सारण सुविधेतील तफावत दुर करण्याचा कृती आराखडा तयार करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक:-संकिर्ण-२०२५/प्र.क्र.१५/नवि-१६ (ई-९३११२७)
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- २३ एप्रिल, २०२५

संदर्भ :-

१) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:- अमृत-२०२२/प्र.क्र.१४१/नवि-३३ दि. १४ जुलै, २०२२
२) नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक:- नगरो २०२३/प्र.क्र.३८९/नवि-३३ दि.२२ फेब्रुवारी, २०२४.
३) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:- स्वमअ-२०२२/प्र.क्र.७३/नवि ३४ दि. १५ जुलै, २०२२
४) नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक:- अशास १४०७/३६०/प्र.क्र.२११/नवि-२० दि. ३१ ऑगस्ट, २००९.
५) नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक: अशसे-२०२३/प्र.क्र.८८/नवि-०४ दि. १५ मार्च, २०२४
६) नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक: अशसे-२०२३/प्र.क्र.८८/नवि-०४ दि. १५ मार्च, २०२४
७) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:- धोरण-२०१७/प्र.क्र.१७१/नवि-१६, दि. १७ नोव्हेंबर, २०१७ दि. ३० सप्टेंबर, २०२०
८) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:- धोरण-२०१७/प्र.क्र.९६/नवि-१६, दि.१२ डिसेंबर,२०१७, दि. ३० सप्टेंबर, २०२० दि. २४ एप्रिल, २०२३.
९) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:-संकीर्ण-२०१५/प्र.क्र. ९०/नवि-१६ दि. १० जून, २०१६.
१०) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:-संकीर्ण-२०१२/प्र.क्र. २४/नवि-१६ दि. २७ जून, २०१२.
११) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:-संकीर्ण-२०१२/प्र.क्र. २७/नवि-१६ दि. २७ जून, २०१२

प्रस्तावना :-

राज्यातील शहरांमध्ये पायाभूत सुविधा विकासाची कामे केंद्र योजना, राज्य योजना, जिल्हा योजना तसेच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्वनिधीतून हाती घेण्यात येतात. प्रत्येक शहरातील सध्या विकसित झालेल्या पायाभूत सुविधा व भविष्यात निर्माण करावयाच्या सुविधांची गरज वेगवेगळी आहे. यास्तव राज्याच्या अर्थसहाय्याने हाती घेण्यात येणाऱ्या विविध पायाभूत सुविधांचा प्राधान्यक्रम निश्चित करून शहरांमध्ये नियोजनबद्ध पद्धतीने पायाभूत सुविधा विकसित करणे व त्यात सुसुत्रता आणण्याकरिता मा.मुख्यमंत्री महोदयांच्या १०० दिवस नियोजन आराखड्यात शहरातील विकास कामावरील गुंतवणुकीचा प्राधान्यक्रम ठरवून शहर पायाभूत सुविधा गुंतवणूक प्राथमिकता आराखडा तयार करण्याचे सुनिश्चित करण्यात आले आहे.

या अनुषंगाने शासनाच्या निधीतून मंजूर करण्यात येत असलेल्या कामांच्या अनुषंगाने शहरातील विकास कामावरील गुंतवणुकीचा प्राधान्यक्रम ठरवून शहर पायाभूत सुविधा गुंतवणूक

प्राथमिकता आराखडा तसेच पाणीपुरवठा व मलनि:स्सारण सुविधेतील तफावत दुर करण्याचा कृती आराखडा तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यातील महानगरपालिका तसेच नगरपरिषद व नगरपंचायतींना विविध पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी केंद्र योजना, राज्य योजना, जिल्हा योजना तसेच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्वनिधीतून अनुज्ञेय असलेल्या कामांकरीता शहर पायाभूत सुविधा गुंतवणूक प्राथमिकता आराखडा व शहरातील विकास कामावरील गुंतवणुकीचा प्राधान्यक्रम पुढील प्रमाणे ५ गटामध्ये प्रस्तावित करण्यात येत आहे-

| अ.क्र. | विकास आराखड्यातील पायाभूत सुविधा |
|---|---|
| १ | पाणीपुरवठा योजना |
| २ | मलनि:स्सारण व अनुषंगिक कामे |
| ३ | घनकचरा व्यवस्थापनाचे भांडवली प्रकल्प/ सार्वजनिक शौचालय/स्वच्छतागृह इ. |
| ४ | रस्ते |
| ५ | प्रशासकीय इमारत, सौर ऊर्जा प्रकल्प, उद्यान/ हरित पट्टे, जलस्त्रोतांचे संवर्धन व पुनर्जीवन, क्रिडांगणे, पथदिवे, स्मशानभूमी, अग्नीशमन केंद्र, मनपा/नपा शाळा व दवाखाने भौतिक सुविधा, आठवडी बाजार, व्यापारी संकुल, बहुपयोगी सभागृह, नाट्यगृह, इ. विकास आराखड्यातील इतर सार्वजनिक सोयी सुविधा विकसित करणे |

०२. नगर विकास विभागाच्या विविध योजनांमधून विविध पायाभूत विकास कामांसाठी निधी मंजूर केला जातो. त्याप्रमाणे मूळ शासन निर्णयान्वये अनुज्ञेय असलेली सर्व कामे त्या-त्या शासन निर्णयात अनुज्ञेय राहतील परंतु कामाचा प्राधान्य क्रम उपरोक्त प्रमाणे राहिल.

०३. पाणीपुरवठा व मलनि:स्सारण सुविधेतील तफावत दुर करण्याच्या कृती आराखड्याबाबत. :-

सद्यस्थितीत राज्यातील २१७ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये १३५ LPCD नुसार पाणीपुरवठा करण्यात येत आहे. उर्वरित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये १३५ LPCD नुसार पाणीपुरवठा करण्यासाठी केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियान, नगरोत्थान महाभियान व इतर देय योजनांमधून पुढील पाच वर्षांमध्ये सदर क्षमता निर्माण करण्यात येईल. तसेच सद्यस्थितीत राज्यातील १०२ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मलनि:स्सारण प्रकल्प कार्यान्वित आहेत. उर्वरित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियान, नगरोत्थान महाभियान, जागतिक बँकेच्या प्रस्तावित महाराष्ट्र नागरी पाणीपुरवठा पुनर्वापर कार्यक्रम (MUWREP) व इतर देय योजनांमधून पुढील पाच वर्षांमध्ये मलजल प्रक्रियेची क्षमता निर्माण करण्याचे विचाराधीन आहे.

०४. गुंतवणूक प्राथमिकता आराखडा व शहरातील विकास कामावरील गुंतवणुकीचा प्राधान्यक्रमाच्या अनुषंगाने नगर विकास विभागाच्या निधीतून हाती घेण्यात येत असलेल्या प्रकल्पांसाठी पुढीलप्रमाणे सर्वसाधारण मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात येत आहेत-

i. केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत हाती घेण्यात येणारे प्रकल्प हे केंद्र पुरस्कृत योजनांच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणेच घेण्यात येतील.

ii. प्रथम पाणीपुरवठा योजनांस मंजूरी देण्यात येईल.

iii. पाणीपुरवठा योजना पूर्ण होऊन कार्यान्वित झाल्यानंतर मलनिःस्सारण प्रकल्प व अनुषंगिक कामे मंजूर करण्यात येतील.

iv. पाणी पुरवठा तसेच मलनिःस्सारण प्रकल्प व अनुषंगिक कामे प्रत्यक्ष कार्यन्वयित होऊन १० वर्ष झाल्यानंतर ड वर्ग महानगरपालिका व सर्व नगरपरिषद व नगरपंचायत सदर प्रकल्पाच्या विस्तारीकरणाकरीता नगरोत्थान महाभियानाच्या धर्तीवर प्रकल्पाधारित स्वरूपात महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास व वैशिष्टयपूर्ण योजनेतून अनुज्ञेय असतील.

v. घनकचरा व्यवस्थापनाकरीता स्वच्छ भारत मिशन अंतर्गत मंजूर असलेल्या प्रकल्पा व्यतिरिक्त अधिकची भांडवली गुंतवणुक (प्रकल्पातील मत्ता निर्मिती होणारी कामे) महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास व वैशिष्टयपूर्ण योजनेतून अनुज्ञेय असतील.

vi. पाणी पुरवठा तसेच मलनिःस्सारण प्रकल्प व अनुषंगिक कामे पूर्ण झालेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना रस्ते प्रकल्प अनुज्ञेय असतील.

vii. शहरांना सदर प्राधान्य क्रमानुसारच कामे मंजूर केली जातील आणि गुंतवणूक प्राथमिकता आराखड्यातील प्राधान्यक्रमातील पायाभूत सुविधा शहराच्या एकूण आवश्यकतेच्या ७५ टक्के उपलब्ध असल्याचे जिल्हाधिकारी यांनी प्रमाणित केल्यानंतर प्राधान्यक्रमातील पुढील काम नगर विकास विभागाच्या विविध योजनेंतर्गत तसेच स्वनिधीतून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस अनुज्ञेय असेल.

viii. प्राधान्य क्रमातील पहिल्या ४ गटातील कामे पूर्ण झाल्यानंतर ५ व्या गटातील कोणतेही काम स्थानिक आवश्यकतेनुसार हाती घेता येईल.

ix. अपवादात्मक परिस्थितीत प्राधान्यक्रम शिथील करून स्थानिक पातळीवरील सार्वजनिक निकड विचारात घेऊन प्राधान्यक्रमातील पुढील काम घेणे आवश्यक असल्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनी दिल्यास त्याबाबतचा अंतिम निर्णय शासन स्तरावरुन घेण्यात येईल.

x. प्राधान्यक्रमात नमूद कामे ज्या योजनेत अनुज्ञेय आहेत त्या योजनेतूनच प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्यात यावीत.

०५. उपरोक्त प्राधान्यक्रम व मार्गदर्शक सुचाना विचारात घेऊन सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्याचे शहर पायाभूत सुविधा गुंतवणूक प्राथमिकता आराखडा तसेच पाणीपुरवठा व मलनि:स्सारण सुविधेतील तफावत दुर करण्याचा कृती आराखडा तातडीने तयार करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२५०४२३१८३२२५१०२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्याक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SACHIN DATTATRAY SAHASRABUDDHE
Date: 2025.04.23 18:33:35 +05'30'

(सचिन द. सहस्त्रबुद्धे)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल महोदयांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई
३. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.राज्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. विभागीय आयुक्त (सर्व)
६. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,बेलापूर भवन ७ वा मजला, नवी मुंबई - ४०० ६१४.
७. जिल्हाधिकारी (सर्व)
८. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
९. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१२. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१४. सहायक संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई - ४०० ६१४
१५. जिल्हा प्रशासन अधिकारी (सर्व)
१६. मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषद/ नगरपंचायती
१७. वित्त विभाग, व्यय-३/कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. कार्यासन नवि-४ नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

वीज देयकात बचत करण्यासाठी सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी अर्थसहाय्य करण्याबाबतचे धोरण निश्चित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक:-संकिर्ण-२०२५/प्र.क्र.१९/नवि-१६ (ई-९३११९६४)
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- २९ एप्रिल, २०२५

संदर्भ :-

(१) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:- धोरण-२०१७/प्र.क्र.१७१/नवि-१६, दि. १७ नोव्हेंबर, २०१७ व दि. ३० सप्टेंबर, २०२०

(२) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. धोरण-२०१७/प्र.क्र.९६/नवि-१६, दि.१२ डिसेंबर, २०१७, दि. ३० सप्टेंबर, २०२० व दि. २४ एप्रिल, २०२३

प्रस्तावना :-

राज्यातील महानगरपालिका तसेच नगरपरिषद व नगरपंचायतींना अनुक्रमे महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास व वैशिष्ट्यपूर्ण या योजनेअंतर्गत विविध विकास कामांसाठी निधी मंजूर केला जातो. सदर योजनांचे निकष संदर्भ क्र.१ व २ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आले आहेत. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना पाणीपुरवठा योजना, मलजल प्रक्रिया केंद्र, घनकचरा प्रकल्प, पथदिवे, प्रशासकिय इमारती इत्यादी ठिकाणी मोठ्या प्रमाणात वीजेची आवश्यकता असते. सदर प्रकल्पांच्या वीज देयकाचा भार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांवर येतो. हा भार कमी करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या १०० दिवस नियोजन आराखड्यात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वीज देयकात बचत करण्यासाठी त्यांना सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी अर्थसहाय्य करण्याबाबत धोरण निश्चित करण्याचे ठरले आहे. या अनुषंगाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सौर ऊर्जा प्रकल्प मंजूर करण्याचे धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास व वैशिष्ट्यपूर्ण या योजनांतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वीज देयकात बचत करण्यासाठी सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे या कामाचा समावेश करून सदर प्रकल्प प्राधान्याने मंजूर करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. सौर ऊर्जा प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत.

१. सौर ऊर्जा प्रकल्पाकरीता सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था पात्र राहतील.

२. वित्तीय आकृतीबंध-

प्रकल्प किंमतीपैकी राज्य शासनाचा व संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा पुढील प्रमाणे राहिल-

| अ.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था | राज्य शासनचा हिस्सा | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा |
|---|---|---|---|
| १ | क व ड वर्ग महानगरपालिका | ७०% | ३०% |
| २ | अ वर्ग नगरपरिषद | ८५% | १५% |
| ३ | ब वर्ग नगरपरिषद | ९०% | १०% |
| ४ | क वर्ग नगरपरिषद/नगरपंचायत | ९५% | ५% |

३. सौर ऊर्जा प्रकल्प शासन मान्यतेस सादर करताना सौर ऊर्जा प्रकल्पाकरीता आवश्यक असलेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या बँकेत जमा असणे आवश्यक आहे.

४. सौर ऊर्जा प्रकल्पाकरीता आवश्यक असलेली जागा व इमारत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या स्वमालकीची असावी तसेच सदर जागा ही नागरी क्षेत्राबाहेरील असल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,१९४९ मधील कलम ८९ व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ मधील कलम ९७ अन्वये संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

५. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सौर ऊर्जा प्रकल्पासाठी प्रकल्प अहवाल (Detailed Project Report) व सौर ऊर्जा प्रकल्पासाठी तांत्रिक मंजुरी (Technical sanction) महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा-MEDA) कडून घ्यावी. त्यासाठीचे विहित शुल्क नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्वनिधीतून महाऊर्जाला अदा करावे. महाराष्ट्र राज्याचे अपारंपरिक धोरण, २०२० नुसार सौर ऊर्जा प्रकल्पाची नोंदणी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा-MEDA) कडे करणे अनिवार्य राहील.

६. सौर ऊर्जा प्रकल्पांशी संबंधित सर्व नियम महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या (MERC) वेळोवेळी जारी केलेल्या किंवा सुधारित केल्या जाणाऱ्या नियमांनुसार असतील.

७. सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी अनुदानाचे वितरण खालीलप्रमाणे तीन हप्त्यांमध्ये केले जाईल.

i. पहिला हप्ता:- सौर ऊर्जा प्रकल्पाचा कार्यारंभ आदेश दिल्यानंतर मंजूर प्रकल्पाच्या ३०% निधी वितरीत करण्यात येईल.

ii. दुसरा हप्ता:- सौर ऊर्जा प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर मंजूर प्रकल्पाच्या ५०% निधी वितरीत करण्यात येईल

iii. तिसरा हप्ता:- सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित होऊन प्रत्यक्ष वीज बचतीचे पहिले वीज देयक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस प्राप्त झाल्यानंतर उर्वरीत अनुदानाची २०% रक्कम वितरीत करण्यात येईल.

८. सदर प्रकल्पाची सुरक्षितता तसेच देखभाल दुरुस्ती करणेबाबत संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने योग्य ती दक्षता घ्यावी.

९. सौर ऊर्जा प्रकल्पाकरीता अनुदान महानगरपालिकांना मुलभुत सोई सुविधांचा विकास करण्याच्या कामांसाठी अनुदान (ले.शि.४२१७ ०५४१ व ले.शि २२१७ ०९१३) व राज्यातील नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान (ले.शि.४२१७ ०६०३ व ले.शि.२२१७ १३०१) या लेखाशिर्षातून उपलब्ध करुन देण्यात येईल.

१०. संदर्भाधीन क्र. (१) व (२) येथील शासन निर्णयामधील अन्य सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२५०४२९१६३०३७२४२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SACHIN DATTATRAY SAHASRABUDDHE
Date: 2025.04.29 16:31:22 +05'30'

(सचिन द. सहस्रबुध्दे)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल महोदयांचे सचिव राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई
३) मा.उप मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई
४) मा.राज्य मंत्री (नगर विकास) महोदयांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई
५) विभागीय आयुक्त (सर्व)
६) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर भवन ७ वा मजला, बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
७) जिल्हाधिकारी (सर्व)
८) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
९) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई
१०) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

१२) सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई

१३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई

१४) सहायक संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई - ४०० ६१४

१५) जिल्हा प्रशासन अधिकारी (सर्व)

१६) मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषद/ नगरपंचायती

१७) वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई

१८) कार्यासन नवि-४ नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१९) निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निविदा पुस्तिकांचा अवलंब करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१६/नवि-१६ (ई-९३१९४७)
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक:- २९ एप्रिल, २०२५

संदर्भ-:

